# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

क्रं.रासनिप्रा/लेखा/कक्ष-१६/जप्त अनामत/विनियोग धोरण/२८८४/२०१६ दिनांक- १० /०५/२०१६

विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये घेण्यात येणा-या सहकारी संस्थांच्या निवडणूकांमध्ये उमेदवारांकडून नियमानुसार जप्त केलेल्या (डिपॉझीट) रकमा ज्या प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या आहेत त्या रकमांच्या विनियोगासंदर्भात धोरण निश्चित करणे.

संदर्भ :- १) राज्य सहकारी निवडणूकांमध्ये उमेदवारांच्या नियमानुसार जप्त केलेल्या उमेदवारअनामत डिपॉझीट (ठेव)/परिपत्रक/४७२४/२०१५ दि.२६/०५/२०१५.

२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निर्गमित केलेले परिपत्रक क्रमांक रासनिप्रा/कक्ष-२/डिपॉझीट (ठेव)/परिपत्रक/७७००/२०१५ दि.०४/०९/२०१५.

**प्रास्ताविक** : - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत झाले असून, सहकारी संस्थेच्या समिती सदस्यांची सार्वत्रिक निवडणूका, नैमित्तीक रिक्त पदांसाठीची निवडणूक व पदाधिका-यांच्या निवडणूका घेणेचे अधिकार प्राधिकरणास आहेत.

महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.११/०९/२०१४ नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (vi) मधील तरतुदीनुसार निवडणूकीसाठी लागणारा निधी ठरविण्याचे व संस्थेकडून जमा करुन घेण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त झाले असून,त्याअनुषंगाने जिल्हा / तालुका निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या नावाने व प्राधिकरणाच्या टॅन क्रमांक PNES४३३५६F अन्वये राष्ट्रीयीकृत व अन्य बँकेमध्ये संयुक्त खाते उघडणेस परवानगी दिलेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३ अन्वये सहकारी संस्थांच्या उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिका-याकडे कोणत्या दराने अनामत रकमा जमा कराव्यात याची निश्चिती केलेली आहे. तसेच निवडणूक निकालानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७० (चार) नुसार विहीत केलेल्या मर्यादेत वैध मते उमेदवारास प्राप्त न झाल्यास अनामत रकमा जप्त करण्यात येतात.

जप्त अनामत रकमा संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यानी सदरील रकमा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, पुणे येथील चालू खाते क्रमांक ३४९४४७०३३३८ यामध्ये E.C.S. / N.E.F.T. / धनादेश / धनाकर्षाव्दारे भरणा करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम२०१४ दि.११/०९/२०१४ रोजी अंमलात आल्यानंतर दि.३१/०३/२०१६ अखेर पुर्ण झालेल्या सर्व निवडणूकांमध्ये रू.१०,५७,९३५/- उमेदवाराची अनामत रक्कम जप्त करून संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यांनी धनाकर्ष / धनादेशाव्दारे प्राधिकरणाकडे जमा केली आहे. सदर रक्कम प्राधिकरणाने स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा येथील प्राधिकरणाचे खाते क्रमांक ३४९४४७०३३३८ मध्ये जमा केली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व नियम ३ (पाच) मध्ये निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी, अधिनियम व नियमांच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण निर्देश देण्याचे प्राधिकरणास अधिकार आहेत. सदर अधिकारास अनुसरून प्राधिकरणाने, उपरोक्त प्रमाणे जप्त केलेल्या उमेदवारी अनामत रकमांचा विनियोग खालील

प्रयोजनासाठी करण्याचे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## - : आदेश : -

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक ) नियम २०१४ चे नियम ३ (v) व ३ (vi) अन्वये प्राप्त तसेच प्राधिकरणास समर्थ करणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन निवडणूका सुरळीत व मुक्त वातावरणात पार पडण्यासाठी उपरोक्तप्रमाणे जप्त केलेल्या उमेदवार निवडणूक अनामत रक्कमांचा विनियोग खालील प्रयोजनासाठी करण्याचे धोरणास या आदेशाव्दारे मान्यता देत आहे. :-

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (E.V.M.) खरेदी करणे.
२. त्यावरील देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक खर्च करणे.
३. सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे प्रशिक्षण साहित्य इलेक्ट्रॉनिक व पारंपारिक माध्यमे यांचा वापर करून तयार करून घेणे.
४. सहकारी संस्थांच्या निवडणूकीतील मतदार जागृती विषयक प्रचार व प्रसिध्दीचा खर्च करणे.
५. सहकारी संस्थांच्या निवडणूका अधिक सुलभ होणेसाठी इलेक्ट्रॉनिक ॲप्लिकेशन विकसित करणे / खरेदी करणे.
६. प्राधिकरणाच्यास्तरावर निवडणूकीसाठी आवश्यक असणारे निवडणूक विषयक व कार्यालयीन साहित्य खरेदी करणे व छपाई करणे.
७. निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी व ट्रेनर्स यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकांना मेहनताना व प्रवास खर्च अदा करणे.
८. मा.उच्च न्यायालय, मुंबई व नागपूर व औरंगाबाद खंडपीठात प्राधिकरणास प्रतिवादी म्हणून दाखल केलेल्या रिट याचिकाच्या संदर्भात प्राधिकरणाची बाजू मांडण्यासाठी प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अभियोक्त्यांना त्यांच्या देय होणा-या फी पोटी अग्रीम रक्कम देणे.

प्राधिकरणाने निश्चित केलेल्या उपरोक्त धोरणास अनुसरून जमा असलेल्या निधीच्या विनियोगाच्या प्रस्तावास प्राधिकरणाच्या लेखा विभागाने, आहरण व संवितरण अधिकारीमार्फत विभाग प्रमुख म्हणून मा.सचिव आणि मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मंजुरी व मान्यता घ्यावी.

मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने

**(डॉ.आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :- मा.प्रधान सचिव, (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव